**MHNS130004372014**

नियमित दिवाणी दावा क्र.५१/२०१४
विलास वि शिवाजी

## निशाणी क्र.४९ वरील आदेश

वादीचे विधीज्ञांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ३९ नियम १ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या गट नं.८२५ मधून तयार केलेल्या रस्त्याचा वापर वहिवाट प्रतिवादींनी दाव्याचा अखेर निकाल होईपावेतो करू नये व आहे ती परिस्थिती कायम ठेवावी असा तुर्तातुर्त ताकीद मनाई हुकूमाचा अर्ज प्रतिवादी क्र १ ते ३ यांच्या विरूध्द दाखल केला आहे.

वादी यांचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

२. दाव्यातील मिळकत तुकडी जिल्हा नाशिक पोटतुकडी ता.निफाड पैकी मौजे ओझरमिग गावठाणातील मिळकत शेतजमिन गट नं.८२५, गट नं.८४१, गट नं.८४२ येणेप्रमाणे दाव्याचा विषय आहे. वादीचे कथन की, गट नं.८२५ ही वादीच्या मालकीची आहे. या मिळकतीच्या उत्तर बाजूला गट नं.८४१ व ८४२ मिळकती या प्रतिवादी यांच्या मालकीच्या आहेत. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या गट नं.८२५ मधून दक्षिणोत्तर रस्ता काढण्याचा प्रयत्न केला, म्हणून वादीने अतिक्रमण केस दाखल केली. प्रतिवादी हे त्यांच्या जमिनीत जाण्यायेण्यासाठी वादीच्या मिळकतीतून नविन वहिवाट करण्याचा प्रयत्न करीत आहेत व त्यासाठी प्रतिवादी यांनी तसा रस्ता तयार केल्यास वादीला अपरिमित नुकसान होईल म्हणून वादीने प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला.

३. वादीचे पुढे कथन की, दाव्याचे कामकाज चालू असतांना, प्रतिवादी यांनी दि.२०.११.२०२५ रोजी वादी त्याच्या पत्नीसोबत रूग्णालयात असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी यांनी त्यांच्या गट नं.८४१ व ८४२ मध्ये जाण्यायेण्यासाठी वादीच्या गट नं.८२५ मधून वादीच्या गैरहजेरीत रस्ता तयार केला व त्याद्वारे प्रतिवादी नविन वहिवाट सुरू करून वादीच्या गट नं.८२५ चे अस्तीत्व संपूष्टात आणत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीने तयार केलेल्या रस्त्यावरून वहिवाट करू नये या करीता प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि.क्र.५२ अन्वये जबाब देत आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादीने अर्जातील सर्व कथने नकारलेली आहेत. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीच्या गट नं.८२५ च्या दक्षिणेस ओझर दिक्षी जाणारा डांबरी रस्ता असून सदर रस्ता हा पूर्वापार पासून अस्तित्वात आहे. सदर रस्त्याचा वहिवाटीचे हक्काने वापर प्रतिवादी व इतर लगतचे मिळकतधारक पूर्वापारपासून करत आहे. पुढे त्यांचे असे कथन आहे की, त्या रस्त्याशिवाय प्रतिवादींना त्यांच्या मिळकतीत जाण्यायेण्यासाठी अन्य पर्यायी रस्ता कधीही नव्हता व नाही. म्हणून प्रतिवादीने त्याच्या प्रतिदाव्यात त्याप्रमाणे ठराव होवून मिळण्यासाठी निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे.

५. प्रतिवादीचे पुढे कथन की, वादी त्याच्या मिळकतीचा व मिळकतीतील विहिरीचा उपभोग विनाहरकत व विनाअडथळा घेत आलेला आहे. त्यास प्रतिवादीने कधीही हरकत केलेली नाही व भविष्यात देखील तशी हरकत करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच दावा मिळकत गट नं.८२५ ही मिळकत वादीच्या मालकीची असल्याची वस्तूस्थिती प्रतिवादींनी नाकारलेली नाही. करिता त्यांनी वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

६. वादीच्या अर्जातील कथने, प्रतिवादीच्या जबाबातील कथने, तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, पुढील मुद्दे उपस्थित होतात, सदर मुद्दे मी माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी प्रकरण वादीच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल तराजू वादीच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३. | अर्ज मंजूर न झाल्यास वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल असे वादी सिध्द करतात काय? | ..नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

**:: कारणमिमांसा ::**

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :**

७. मुद्दा क्र.१ ते ३ एकमेकांशी निगडीत असल्यामुळे सदर मुद्दे एकित्रत विचारार्थ घेण्यात आलेले आहेत. वादीतर्फे विधिज्ञ श्री.बी.ए.जाधव व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.आर.टी.चव्हाण यांचा युक्तीवाद ऐकला. सदर मनाई हुकूमाचा आदेश स्वत:च्या लाभात होण्याकरिता वादीने त्याची केस प्रथमदर्शनी चांगली असल्याचे, तसेच न्यायाचा तौलानिक तराजू देखील वादीच्या लाभात असल्याचे व मनाई हुकूम वादीच्या लाभात दिला गेला नाही तर वादीला अपरिमीत नुकसान होणार आहे, हे सिध्द करणे आवश्यक आहे. वादीने आपल्या कथनाप्रित्यर्थ्य निशाणी क्र.५४ अन्वये साक्षीदार अनंत जाध यांचे प्रतिज्ञापत्र, गट नं.८२३ चा ७/१२ उतारा व फोटोग्राफ दाखल केलेले आहे.

८. अर्ज, जबाब व अभिलेखावर दाखल दावा, कैफियत व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा हा ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. गट नं.८२५ ही वादीच्या मालकीची तसेच गट नं.८४१ व ८४२ ही प्रतिवादी यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची आहे ही बाब वादादीत नाही. वादीचे वादपत्र व प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही मधील मजकूर हा समान व एकस्वरूप आहे. वादीच्या वादपत्रात प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि.२०.०४.२०१४ रोजी वादीच्या जमिनीतून रस्ता तयार केल्याचे नमूद केलेले आहे. वादीने वादपत्रात सदर रस्त्याचे अस्तित्व दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी तयार केल्याचे व त्याकरीता वादीने अतिक्रमण केस दाखल केल्याचे दिसून येते. वादीच्या कथनानुसार प्रस्तुत अतिक्रमण केस तसेच त्याविरूध्द केलेले रिव्हीजन फेटाळण्यात आलेले आहे.

९. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांचा दि.२६.०७.२०२३ रोजी सरतपास व उलटतपास नि.क्र.३५ अन्वये नोंदविलेला आहे. वादीने त्यांच्या उलटतपासात वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीच्या दक्षिण बाजूस ओझर सुकेणे जाणारा डांबरी रस्ता असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच वादीने त्यांच्या उलटतपासात वाद मिळकत गट नं.८२५ च्या वादीच्या मालकी हक्काबाबत तसेच त्या गटातील विहिरीच्या वापरास प्रतिवादींकडून कधीही हरकत घडलेली नसल्याचे देखील

मान्य केलेले आहे. त्यांनी हे देखील मान्य केले की, त्यांनी दि.२१.०१.२०१० रोजी जमिन मोजणी केली होती. मोजणी अहवालानुसार वादीच्या मिळकतीतून रस्त्याचा काही भाग गेल्याचे दर्शविण्यात आल्याची बाब देखील वादीने त्याच्या उलटतपासात मान्य केलेली आहे.

१०. वादीच्या वादपत्रातील कथनांवरून तसेच उलटतपासातील मान्य केलेल्या कथनांवरून असे दिसून येते की, वादादीत रस्त्याचे अस्तित्व दावा दाखल करण्यापूर्वी पासूनचे आहे. अशी परिस्थिती असतांना वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे पुन्हा वादपत्रातील मजकूर घेवून वादादीत रस्ता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि.२०.११.२०२५ रोजी तयार केल्याचे कथन करत, प्रतिवादी हे नविन वहिवाट सुरू करून वादीच्या गट नं.८२५ चे अस्तित्व संपुष्टात आणत असल्याचे कथन करीत आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सदर रस्त्याचा वापर वहिवाटीसाठी करू नये अशी मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे. जर वादीच्याच वाद पत्रातील कथनानुसार वादादीत रस्ता हा सन २०१४ मध्ये तयार करण्यात आलेला आहे, तर अशा परिस्थितीत प्रतिवादी यांनी पुन्हा सन २०२५ मध्ये तो रस्ता तयार केल्याचे वादीचे कथन संशयास्पद वाटते. वादीने त्याच्या कथन प्रित्यर्थ तोंडी युक्तीवादाव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करून वादादीत रस्त्याची निर्मिती ही दि.२०.११.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी केल्याचे अभिलेखावर आणलेले नाही.

११. याउलट प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत व प्रतीदावा सन २०१५ मध्ये दाखल करत वादादीत रस्ता पूर्वापार पासूनचा असल्याचे तसेच त्या रस्त्यावरून वादी, प्रतिवादी क्र.१ ते ३ व लगत शेतकरी वहिवाट करत असल्याचे कथन केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी यांची गट नं.८२५ ची मालकी नकारत नाहीत. तसेच वादीच्या उलटतपासातील मान्य कथनांनुसार त्या गटातील विहिरीच्या वापरास देखील प्रतिवादी क्र.१ ते ३ कोणताही अडथळा वा हरकत करत नाहीत असे दिसून येते. त्यामुळे देखील अर्जातील कथनांबाबत संशय निर्माण होतो.

१२. वादीचा सरतपास, उलटतपास यावरून हे देखील दिसून येते की, वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना पर्यायी रस्ता असल्याबाबत कोणतेही कथन केलेले आहे

अथवा पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना धाकदडपशाहीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या मिळकतीच्या दक्षिणेस असलेला वादादीत रस्त्यावरून वहिवाट केलेली आहे. याठिकाणी हे देखील नमूद करणे आवश्यक आहे की, वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवादावेळी प्रथमदर्शनी प्रकरण व न्यायाचा समतोल तराजू वादीच्या बाजूने असल्याबाबत तसेच अर्ज मंजूर न झाल्यास वादीचे कशाप्रकारे कधीही न भरून येणार नुकसान होईल याबाबत मौन बाळगलेले आहे.

१३. वरील नमूद कारणांआधारे वादीने या प्रकरणात प्रथमदर्शनी केस दाखविली आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे न्यायाचा तौलानिक तराजू देखील वादीच्या लाभात आहे असे देखील म्हणता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये सदरचा मनाई हुकूम वादीच्या लाभात केला गेला नाही तर वादीला अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे असे म्हणता येणार नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ बाबत पुढील आदेश पारित करीत आहे :

आदेश

१. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही /-xxx

(व्ही.डब्ल्यू. खेंदाड)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पिंपळगाव (ब) ता.निफाड, जि. नाशिक

दिनांक :०९/०४/२०२६
ठिकाण : पिंपळगाव (ब)